# प्रेसनोट

दि. २५/०५/२०२३

**जुन्नर येथील शासकीय आश्रमशाळेच्या प्रभारी मुख्याध्यापकावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | ओतूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. २२५/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३८ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक अरुण दगडू महाकाळ, वय ५७ वर्ष, प्रभारी मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, मुथाळने, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ०३/०४/२०२३
गुन्हा दाखल दिनांक :- २५/०५/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा टँकरने पाणी पुरवठा करण्याचा व्यवसाय असून, त्यानी शासकीय आश्रमशाळा, मुथाळने येथे पुरविण्यात आलेल्या पाण्याचे टँकरचे बिल मंजुर केल्याचा मोबदला म्हणून कार्यालयातील इतर कर्मचारी यांचेकरीता लोकसेवक अरूण महाकाळ यानी ५,०००/- रुपये (पाच हजार रुपये) लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचेकडे मुख्याध्यापक महाकाळ यांनी शासकीय आश्रमशाळा, मुथाळने येथे पाणी पुरवठा केल्याचा मोबदला म्हणून कार्यालयातील कर्मचारी यांचेसाठी ५,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणून वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.